


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६३, शनिवार ६ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# जनावरांसह खा. नीलेश लंके यांचा ठिय्या!

## ■ जिल्हाधिकारी कार्यालय घोषणांनी दुमदुमले ■ हजारो शेतकऱ्यांसह जनावरांचाही आंदोलनात सहभाग ■ आऊटपुट घेउनच जाणार, खा. लंके यांचा निर्धार ■ उपजिल्हाधिकाऱ्यांशी चर्चेला नकार ■ आंदोलन चिघळण्याची शक्यता

नगर : सुदेश आबूज

**दूध तसेच कांद्याच्या दरासंदर्भात खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चास मोठा प्रतिसाद लाभला. हजारो शेतकऱ्यांसह जनावरांचाही या आंदोलनात सहभाग आहे. आंदोलक कार्यालयाबाहेर पोहचल्यानंतर घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दुमदुमले होते. दरम्यान, प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने खा. लंके यांनी शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ठिय्या दिला आहे.दरम्यान खा.लंके यांच्याशी चर्चा करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील हे आंदोलनस्थळी आले होते.मात्र हे प्रश्न शेतकऱ्यांच्या संबंधित व गांभीर्याचे असल्याने चर्चेसाठी जिल्हाधिकाऱ्यांनीच यावे या भूमिकेवर लंके ठाम राहिल्याने आंदोलन चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

यावेळी माध्यमांशी बोलताना खा.लंके म्हणाले, फक्त घोषणा करायच्या, पाच टक्के शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होत नाही. कागदपत्रे गोळा करण्यासाठी नादी लावायचे, चार दोन लोकांना अनुदान मिळाले तरी त्याचे चेक वाटपाचे कार्यक्रम केले जातात. तुम्ही आम्हाला भिक देता काय ? शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळाला पाहिजे ही आमची मागणी आहे.

लंके पुढे म्हणाले, आज आम्ही जिल्हयाच्या ठिकाणी आंदोलन केले आहे. सरकारने दखल घेतली नाही तर राज्याच्या राजधानीमध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन करण्यात येईल. त्या आंदोलनात मुकी जनावरेही आणली जातील. आज आम्हाला न्याय मिळाला नाही तर आम्ही याच ठिकाणी जनावरांची छावणी सुरू करून बसणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

यावेळी बाबासाहेब भोस, महादेव राळेभात, राजेंद्र आघाव, विक्रम राठोड, अभिषेक कळमकर, किरण काळे, किरण कडू, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, संदीप कर्डीले, प्रकाश पोटे, शिवशंकर राजळे, गहिनीनाथ शिरसाठ, अर्जुन भालेकर, संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, शरद झोडगे, रोहिदास कर्डीले, योगीराज गाडे, खंडू भुकन, केशव बेरड, शरद बडे, किसनराव लोटके, सिताराम काकडे, सुदाम पवार, नलीनी गायकवाड, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, रामदास भोर, अप्पासाहेब शिंदे, नवनाथ रासकर, योगेश मते, डॉ. बाळासाहेब कावरे, भुषण शेलार, बाळासाहेब खिलारी, ओमकार सातपुते, सुभाष शिंदे, डॉ. सचिन औटी, बाळासाहेब नगरे, सतिश भालेकर, रविंद्र राजदेव, श्रावण काळे यांच्यासह हजारो शेतकरी उपस्थित होते.





■ शेतकरी आंदोलनासाठी खा.लंके हे बैलगाडीतून जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचले ■ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारातून बैलगाडी आत घालण्याचा आंदोलकांनी प्रयत्न केला. (छाया : लहू दळवी,नगर)

### त्यांना एक नवरा चालत नाही !

लाडकी बहिण झाली, भाऊ झाला आता नवरा आणायचा राहिला असल्याचे सांगत शेतकरी संघटनेचे नेते देठे म्हणाले, त्यांना एक नवरा चालत नाही. हे धृतराष्ट्राचे सरकार नाही तर गांधारीचे सरकार असल्याची टीका देठे यांनी केली.

### सगळयाच सवयी !

खासदार नीलेश लंके हे शेतकऱ्यांसमवेत उन्हामध्ये बसल्याचा धागा पकडून राजेंद्र फाळके यांनी खासदार लंके यांना सगळयाच सवयी असल्याचे सांगताच सगळया म्हणजे कोणत्या सवयी ? उन्हात, पावसात बसण्याच्या का असा सवाल उपस्थितांनी केल्या. त्यावर लंके यांना लोकसभेत इंग्रजी बोलण्याची त्यांना सवय असल्याचे सांगताच एकच हशा पिकला. माझे बोलणे भल्या भल्यांना समजत नसल्याची पुष्टीही फाळके यांनी जोडली.

### गुजरात, पंजाबमध्ये भाव, महाराष्ट्रात का नाही ?

सरकारने पाच रूपये अनुदानाची पुन्हा घोषणा केली आहे. ही भिक आहे, आमचे हक्काचे आम्हाला द्या. शेजारी गुजरातमध्ये गेले तर दुधाला ४० रूपये लिटरचा भाव मिळतो. पंजाबमध्ये ४५ रूपये दर मिळत असताना महाराष्ट्रात ही स्थित का आहे ? असे असेल तर शेतकरी गप्प बसेल का ? शेतकऱ्यांठी आम्ही लढा उभा केला असल्याचे लंके म्हणाले.

### आऊटपुट घेऊनच जाणार

आमच्या आंदोलनाकडे जिल्हाधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. आम्हाला हात जोडता येतात आणि बाहया देखील वर करता येतात. शेवटी आमचे नाते शेतकरी, सर्वसामान्य जनतेशी आहे. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांच्या दारात आलो आहोत, येथून आऊटपुट घेऊनच जाणार असल्याचा निर्धार खा. नीलेश लंके यांनी केला.

### लक्षवेधी फलक आणि मी शेतकरी !

दुधाला बाजारभाव मिळालाच पाहिजे, कांद्याला बाजारभाव मिळालाच पाहिजे, नाकर्त्या सरकारने केलाय वांधा, मातीमोल विकतोय दुध व कांदा, शासनाचा आदेश घडोघडीला शेतकरी लावलांय देशोधडीला अशा अशायाचे फलक मोर्चे कऱ्यांच्या हातात होते. मी शेतकरी असे लिहिलेल्या टोप्या परीधान केलेले आंदोलक लक्ष वेधून घेत होते.

### गृहमंत्री आणि दुधाचा काय संबंध?

पालकमंत्र्यांना शेतकऱ्यांची जाण असेल तर त्यांनी दुधाला हमीभाव देणे गरजेचे आहे. पालकमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेतली, दुधाचा आणि केंद्रीय गृहमंत्र्यांचा संबंध काय ? दुधाच्या प्रश्नासंदर्भात मी सुप्रियाताई सुळेंसह पियुष गोयल यांना भेटलो. गोयल यांनीही हा प्रश्न राज्य पातळीवरील असल्याचे सांगितले. लोकांची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. चुकीच्या बातम्या प्रसारीत करून धुळफेक करणे हे आता चालणार नाही.

खासदार नीलेश लंके

### आंदोलनाची घोषणा आणि जमावबंदी !

खासदार नीलेश लंके यांनी कांदा व दुध प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचे निवेदन सादर केल्यानंतर जिल्हाधिकारी सिध्दाराम सालिमठ यांनी गुरूवारी १२ जुलैपर्यंत जमावबंदीचा आदेश जारी केला. वास्तविक जिल्हयात सर्वत्र शांतता असताना जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेल्या जमावबंदीच्या आदेशाविरोधात लंके समर्थकांकडून तिव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या या भूमिकेचा त्यांना संविधानाची प्रत देऊन निषेध करण्यात येणार होता. संविधानाची प्रतही आंदोलनस्थळी आणण्यात आली होती.

### गणपतीचे दर्शन आणि छत्रपतींना अभिवादन

दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास लंके यांचे पावन गणपती मंदिर परीसरात खा. लंके यांचे आगमन झाले. गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर लंके यांनी शेजारच्या महानगरपालिका कार्यालयाच्या आवारात जात तेथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### खा. लंके बैलगाडीतून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

महानगरपालिका कार्यालयापासून खा. लंके हे बैलगाडीतून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोहचले. लंके यांच्या हातामध्ये बैलांचा कासरा होता. गळयात कांद्याची माळ व डोक्यात मी शेतकरी लिहिलेली टोपी त्यांनी परीधान केली होती.

### भजनी मंडळाचाही सहभाग

मोर्चामध्ये तसेच आंदोलनस्थळी भजनी मंडळ सहभागी झाले होते. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोहचल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रतिसाद मिळणार नाही हे गृहीत धरून पुढील आंदोलनासाठी आगोदरच मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. या मंडपामध्ये जात विविध नेतेमंडळींनी सरकारच्या भूमिकेविरोधात तिव्र भावना व्यक्त केल्या. काही काळानंतर भजनी मंडळाने मंडपामध्ये विविध अभंग सादर केले.

### खा. लंके उन्हात

आंदोलनासाठी उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये नेते कार्यकत्यांची गर्दी झाल्याने खा. नीलेश लंके यांनी मंडपाबाहेर येत समोर उन्हामध्ये बसलेल्या शेतकऱ्यांमध्ये ते जाऊन बसले. उशिरापर्यंत खा. लंके हे उन्हामध्येच बसून होते.

### दुभत्या गायी आणि म्हशीही

मोर्चासाठी दुभत्या गायी तसेच म्हशीही आणण्यात आल्या होत्या. आंदोलनस्थळी पोहचल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराला गायी बांधण्यात आल्या. तर बैलगाडीही कार्यालयाच्या प्रवेशद्वारापुढे सोडण्यात आली.

### आवारात बैलगाडी घुसविण्याचा प्रयत्न

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तसेच बॅरेकेटस् लावण्यात आले असले तरीही लंके समर्थकांनी सुरक्षा व्यवस्था भेदून जिल्हाधिकारी कार्यालयात बैलगाडी घुसविण्याचा प्रयत्न केला मात्र चोख सुरक्षा व्यवस्थेमुळे हा प्रयत्न असफल झाला.

### त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था

खा. नीलेश लंके हे आक्रमकपणे आंदोलन करतात याचा अनुभव असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. तिहेरी बॅरेकेटस लावण्यात येऊन कोणत्याही परिस्थितीत आंदोलकांना कार्यालयाच्या आवारात शिरू द्यायचे नाही अशी व्यवस्था पोलीस प्रशासनाने गुरूवारीच करून ठेवली होती. सुरक्षेची उपाययोजना म्हणून आंदोलनस्थळी अग्निशमन यंत्रणाही तैनात ठेवण्यात आली होती.

### जे बांधावर ते खाली बसणार नाहीत !

जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन सुरू झाल्यानंतर अनेक कार्यकर्ते सावलीमध्ये उभे होते. ध्वनीक्षेपकावरून त्यांना खाली बसण्याची विनंती करण्यात येऊनही ऐकले जात नसल्याने खा. लंके यांनी हातात माईक घेऊन जे खाली बसणार नाहीत ते बांधावरचे शेतकरी आहेत असे मी समजेल असे सुनावताच सर्वजण खाली बसले.

### खा. लंके यांनी शब्द पाळला

केंद्र व राज्य सरकारकडून शेतकरी नागवला जात असून शेतमालास भाव नसल्याने शेतकऱ्यांमध्ये दोन्ही सरकारविषयी रोष आहे. अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये केंद्रामध्ये भाजपाला बहुमत न मिळाल्याने काही राज्यांच्या पाठींब्यावर मोदी सरकार सत्तेवर आले आहे. आपण, इंडिया आघाडी विरोधी भूमिकेत आहोत. लोकसभा निवडणूकीदरम्यान खा. नीलेश लंके यांनी कांदा व दुधाच्या प्रश्नावर आंदोलन करण्याचा शब्द दिला होता. आज आंदोलन करून त्यांनी त्यांचा शब्द पाळला आहे.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### तर राज्यपातळीवर आंदोलन

खा. नीलेश लंके यांनी शेतकरी वर्गाच्या न्यायय मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारले आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर राज्यपातळीवर आंदोलन करण्यात येऊन या आंदोलनात महाविकास आघाडीचे सर्व ३१ खासदार सहभागी होतील. आंदोलनाची ही चुणूक असून राज्य सरकारने त्याची दखल घ्यावी.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### अनुदान नको, पुर्वीचा भाव द्या

सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली आहे. ही घोषणा फसवी असून आम्हाला अनुदान नको तर पुर्वी जो ३८ रूपये दर होता तो द्या अशी मागणी संदेश कार्ले यांनी केली. कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क आकारून सरकार त्यातही शेतकऱ्यांचे पैसे खात असल्याचा आरोप कार्ले यांनी केला.

### लंके २५ वर्षे खासदार राहणार !

पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे तीन महिन्यांचे पाहुणे आहेत. त्यानंतर राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार आहे. सर्वसामान्य घरातील खासदार नीलेश लंके हे पुढील २५ वर्षे खासदार असतील. लंके यांची धास्ती घेउन पालकमंत्र्यांना गल्ली बोळातून फिरावे लागले तरीही तत्कालीन फुगीर खासदाराला पराभव पत्करावा लागल्याचे अनिल ठवाळ यांनी सांगितले.

### सरकारचा घोषणांचा पाऊस

सध्या राज्यामध्ये विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असून विधानसभा निवडणूकींच्या पार्श्वभुमीवर सरकारने घोषणांचा पाऊस पाडला आहे. मात्र या घोषणांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांच्याकडे कार्यकाळ कुठे आहे असा सवाल करून राजेंद्र फाळके म्हणाले, दुधाला ३० रूपये भाव ५ रूपये अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली. जे अनुदान दिलेच नाही त्याच अनुदानाची पुन्हा घोषणा करण्यात आली असून जिल्हयाचे पालकमंत्री दुग्धविकास मंत्री आहेत त्यांनी ४० रूपये हमी भाव ५ रूपये अनुदान द्यावे अशी मागणी राजेंद्र फाळके यांनी केली.

### बैलगाडी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जाईल !

मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून उठणार नाही. मंत्र्यांची गाडी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जाऊ शकते मग आम्ही शेतकऱ्यांच्या बैलगाडीला आडकाठी का ? तीन महिन्यानंतर राज्यात आमचेच सरकार येणार आहे. त्यावेळी शेतकऱ्यांची हीच बैलगाडी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जाईल. मागून दिले नाही तर हिसकाऊन घेण्याची ताकद महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे सांगताना दुग्ध विकास मंत्र्यांच्याच जिल्हयात शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या पाहिजेत असे राजेंद्र फाळके यांनी ठामपणे सांगितले.

### अधिवेशन सोडून त्यांनी दिल्ली गाठली !

खासदार नीलेश लंके हे दिल्लीमध्ये गृहमंत्री अमित शहा यांना भेटल्याची छायाचित्रे पाहिल्यानंतर विखे-पिता पुत्रांनी विधानसभेचे अधिवेशन सोडून दिल्ली गाठल्याची मिश्किली शेतकरी संघटनेच्या देठे यांनी केली. विखे परीवार शेतीशी निगडीत आहे, गेली ५० वर्षे त्यांच्याकडे सत्ता आहे असे असतानाही कांदा, दुधाचे प्रश्न का सुटले नाहीत ? असा सवाल देठे यांनी केला.









फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

# महागड्या सिल्क साड्यांचा रंग जातोय?

**सिल्कच्या साड्या अत्यंत सुंदर, नाजूक आणि महागड्या असतात. अनेक महिला सिल्क साडी परिधान करण्याला पसंती देतात. या इतक्या सुंदर असतात की त्या पार्टी किंवा कार्यक्रमामध्ये वापरल्या जातात. पण सिल्क साड्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. जेणेकरून ती खराब होऊ नये. त्यांचा कापड, रंग आणि डिझाईन इत्यादी फिके आणि खराब होऊ नये म्हणून महिलांना साड्यांची जास्त काळजी घ्यावी लागते. सिल्कच्या साड्या कशा ठेवाव्यात, जेणेकरून त्या कशा धुतल्या पाहिजे आणि कशा हाताळल्या पाहिजे हे सर्व तुम्ही येथे जाणून घेऊ शकता...**

## सिल्क साडी कशी हाताळावी ?

- सिल्क साडी कपाटात ठेवण्यापूर्वी धूवून घ्या. तुम्ही घातलेली सिल्क साडी कपाटात बंद करून ठेवली असेल तर तसे करू नका. यामुळे, तिची चमक कमी होईल आणि साडी लवकर खराब होऊ शकते. ते कपाटात ठेवण्याआधी ते पूर्णपणे धूणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून ती जास्त काळ चांगली राहील.
- काही स्त्रिया कपाटात हँगर्सवर साड्या लटकवतात. कॉटन, जॉर्जेट आणि शिफॉनच्या साड्या तुम्ही नक्कीच लटकवू शकता, पण सिल्कच्या साड्या कपाटात जास्त वेळ लटकवणं टाळा. यामुळे साडी खराब होऊ शकतात. तुम्ही ते एक-दोन दिवस हँगरमध्ये लटकवा, पण लोखंडीऐवजी प्लास्टिकच्या हॅन्गरमध्ये लटकवा.
- तुम्ही सिल्कची साडी नेसून पार्टीला गेला असाल तर घरी आल्यावर लगेच कपाटात ठेवू नका. घामामुळे, ओलाव्यामुळे साडी खराब होऊ शकते आणि डागही पडतात. प्रथम काही वेळ पंख्याखाली उघड्यावर ठेवा.
- घरातील सिल्क साडी कधीही वॉशिंग मशीन किंवा साबणाने धुवू नका. ते नेहमी ड्राय क्लीन करून घ्या. यामुळे त्याचे फॅब्रिक, रंग, डिझाइन आदी खराब होणार नाही. शिवाय, ते बऱ्याच काळ नव्यासारखे दिसेल. चमक देखील कायम राहील.
- सुरकुत्या टाळण्यासाठी, साडीच घडी घालताना नेहमी ॲसिड-फ्री टिश्यू पेपर ठेवा. नियमित टिश्यू पेपर वापरणे टाळा. कारण त्यात आम्ल असू शकते, ज्यामुळे फॅब्रिक खराब होऊ शकते.
- प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये रेशमी साड्या कधीही ठेवू नका. यासाठी कापडापासून बनवलेली पिशवीच वापरावी. या साड्या तुम्ही कॉटनच्या पिशव्या आणि कव्हरमध्येही ठेवू शकता. प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये ओलावा साचल्याने बुरशी येऊ शकते. यामुळे तुमची महागडी सिल्क साडी खराब होऊ शकते.
- थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असलेल्या ठिकाणी सिल्क साडी ठेवण्याऐवजी, अंधाऱ्या आणि थंड ठिकाणी ठेवा. सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यामुळे रंग फिकट होण्याची शक्यता वाढते. साड्यांची कपाटात ठेवताना वेळोवेळी बाजू फिरवत राहा, जेणेकरून कायमस्वरूमी घडी घातल्याच्या खुणा राहणार नाहीत.
- कपाटात ठेवलेल्या तुमच्या सिल्क साड्यांना बुरशी आणि किडे येऊ नयेत असे वाटत असेल तर साडीच्या मध्यभागी कडुनिंबाची पाने आणि देवदाराचे गोळे ठेवू शकता. सिल्क साड्यांमध्ये नॅप्थालीनचे गोळे (मॉथबॉल) ठेवू नका, कारण त्यात हानिकारक रसायने असतात.
- महागड्या सिल्क साड्या नेहमी व्यावसायिकांकडून स्वच्छ करा. जर तुम्ही ड्राय क्लीनिंग करत असाल, तर ते एखाद्या चांगल्या ठिकाणाहून करा ज्याला नाजूक कापड व्यवस्थित कसे हाताळायचे हे माहित आहे.
- जर एक लहान डाग काढण्यासाठी साडी धुण्याची आवश्यकता असेल तर फक्त सौम्य डिटर्जंट वापरा जो खास मऊ, नाजूक कापडांसाठी बनवला जातो. थंड पाण्यात हलक्या हाताने साडी बुडवा आणि ती पिळणे टाळा.





# संबळपुरी साडी नेमकी आली कुठून?

**बांधा किंवा इकत या नावाने प्रसिध्द असलेली संबळपुरी साडी मूळची ओडिसाची आहे. चार मीटर ते नऊ मीटरपर्यंत मिळणारं हे कापड ओडिसातील महिला विविध प्रकारांनी नेसतात. संबळपुरी साडी पाचवारी पध्दतीने नेसली जाते. संबळपुरी साडी ही ओडिसातील मुख्यतः सोनेपुर, संबळपुर, बालंगीर या ठिकाणी विणली जाते. हातमागावर विणलेल्या या साडीची खासियत आहे बांधकला. यामध्ये धागे रंगाच्या पाण्यात ठेवले जातात. नंतर या रंगीत धाग्यांनी कापड विणले जाते. या विणकामाची खासियत म्हणजे विणल्यानंतर कापड दोन्ही बाजूंनी सारखेच दिसते. ही साडी कॉटन व सिल्क या दोन्ही प्रकारात मिळते. त्यामुळे ज्यांना कॉटनच्या साड्या वापरण्याची आवड आहे त्यांनाही उत्तम पर्याय उपलब्ध असतो.**

## कसे असते नक्षीकाम




संबळपुरी साडीवर अजूनही पारंपारिक नक्षीकाम केले जाते. यामध्ये शंख, चक्र, फुले इत्यादींची नक्षी असते. हे विणकाम इतके सुबकतेने केलेले असते, की पहिल्यांदा पाहिल्यावर नक्षी छापली आहे असा भास होतो. विणकामाचे ठिकाण आणि नक्षीकाम यावरून साडीचे विविध प्रकार पडतात. जसे की, सोनेपुरी, पसपली, बोमकाइ, बापटा आदी. धागे रंगवून मग विणण्याच्या या पध्दतीमुळे संबळपुरी साडीचा रंग खूप वर्षे टिकून राहतो. त्यामुळे घरच्या घरीच साबणाच्या पाण्यात धुतली तरी चालते. रंग जात नसल्यामुळे इतर हलक्या रंगाच्या साड्यांसोबत ठेवली तरी चालते. या साडीची किंमत पाचशे ते सहाशे रुपयांपासून सुरू होऊन काही हजार आणि अगदी लाखांपर्यंतही जाते. कॉट्न व सिल्क धाग्यांच्या गुणवत्तेनुसार आणि नक्षीकामानुसार साडीची किंमत ठरवली जाते.

## काळजी कशी घ्याल ?

इतर सिल्कच्या साड्यांप्रमाणेच या साड्या सुती कपड्यांमध्ये बांधून ठेवाव्यात. साडी हँगरला ठेवण्यापेक्षा अशी ठेवल्यास ती जास्त चांगली राहते. हल्ली साड्या नेसण्याचे प्रमाण कमी झाल्याने दिर्घकाळ साड्या वापरात येत नाहीत अशावेळी साडी पडून राहील्यास घडीला विरू शकते. त्यामुळे साड्यांच्या घड्या बदलून ठेवाव्यात. ही साडी थंड पाण्यात हलकीशी पावडर टाकून हाताने धुवावी किंवा ड्रायक्लीनला टाकावी. उन्हाने रंग फिका पडण्याची शक्यता असल्याने शक्यतो कोणत्याच साड्या उन्हात वाळवू नयेत.

# सायलीचा कॉटन साडीतील मनमोहक लूक



**सायली संजीवने मालिक आणि चित्रटातून अनेकांचे मन जिंकून घेतले आहे. ती नेहमीच सोशल मीडियावरही सक्रिय असते. सायलीने नुकतेच निळ्या रंगाच्या कॉटन साडीतील फोटो पोस्ट करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. साधेपणा आणि सौंदर्याचा उत्तम मेळ म्हणजे सायली संजीव असेच म्हणावे लागेल. 'साडी नेसणं म्हणजे आनंद' अशी कॅप्शन पोस्ट करत तिने या साडीतील अनेक लुक शेअर केले आहेत, तर तिच्या या लुकमुळे तिचे चाहते भान हरपून बसले आहेत. तर तिच्या चाहत्याने तिच्या या लुककडे पाहून म्हटलंय, 'लवकर गूड न्यूज देऊन टाक कोण आहे तो ज्यासाठी हरपून बसली आहेस'. सध्या सगळीकडे लग्नाचे वारे वाहत आहेत, त्यामुळे सायलीदेखील आता आपल्या आयुष्यातील जोडीदार कोण आहे हे कोडं उलगडणार का ? असा प्रश्न चाहत्यांना पडलाय.**

- प्रिंटेड कॉटन साडी : कॉटन साडी म्हणजे नेसायला अत्यंत हलकी पण दिसायला रॉयल. सायलीने नेसलेली ही कॉटन साडी असा लुक देत आहे. यावर पक्ष्यांचे प्रिंटिंग करण्यात आले असून काठाला गोल्डन बॉर्डर देण्यात आली आहे. उन्हाळ्यात फॅशन करण्यासाठी सायलीची ही स्टाईल परफेक्ट ठरेल.
- चिकनकारी ब्लाऊज : या साडीसह डीप नेक चिकनकारी ब्लाऊज सायलीने मॅच केला आहे. जो अत्यंत स्टायलिश आणि क्लासी दिसून येत आहे. सध्या चिकनकारी व्हाईट ब्लाऊजची फॅशन अधिक ट्रेंडमध्ये आहे. कॉटन चिकनकारी ब्लाऊज अशा साडींसह मॅच करणे अधिक फॅशनेबल दिसते. सायलीची ही स्टाईल खूपच छान झाली आहे.
- मोकळ्या केसांची स्टाईल : सायलीने यासह आपले स्ट्रेट असणारे केस मोकळे ठेवले आहेत आणि त्याला खालून कर्ल लुक दिला आहे. तसंच हायलाईट केलेले तिचे केस अधिक सुंदर आणि आकर्षक दिसत आहेत. तिच्या या लुकमुळे चाहते सध्या तिच्यावर अधिक फिदा झालेले दिसून येत आहे. तुम्हीही एखाद्या साध्याशा कार्यक्रमासाठी अशी कॉटनची साडी निवडू शकता.
- ऑक्सिडाईज्ड कानातले : सायलीने यासह हेव्ही ऑक्सिडाईज्ड कानातले घातले असून निळ्या साडीसह याचा परफेक्ट स्टायलिश लुक दिसून येत आहे. या कानातल्यांना खाली पांढरे मोती जोडण्यात आले असून निळ्या पांढऱ्या साडीच्या कॉम्बिनेशनसह याची शोभा अधिक वाढली आहे. तर सायलीने केवळ कानातले घालत हा लुक पूर्ण केलाय.
- सटल मेकअप : सायलीने यासह अगदी सटल मेकअप केलाय. फाऊंडेशन, काजळ आणि थोडासा स्मोकी आईज लुक, कपाळावर लहानशी टिकली, चिक हायलायटर आणि न्यूड लिपस्टिक असा तिचा लुक खूपच आकर्षक आणि लोभसवाणा दिसून येत आहे. साडीसह हा मेकअप अगदी परफेक्ट जुळून आलाय आणि त्यामुळे सायलीच्या सौंदर्यात भर पडली आहे.

# चंदेरी साडी





**मध्य प्रदेशमधील अशोकनगर जिल्ह्यातील 'चंदेरी' शहर ऐतिहासिक ठिकाणांसाठी प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे तिथे विणल्या जाणाऱ्या चंदेरी साडीसाठी देखील. ऐतिहासिक नोंदीनुसार चंदेरी ही शिशुपाल राजाच्या राज्याची राजधानी होती. चंदेरी विणण्याची ही कला तेराव्या शतकात राजा शिशुपालाच्या राजकाळात प्रसिद्ध झाली. सुरुवातीला कारागीर मुख्यतः मुस्लिम असत, इ.स.१३५० च्या सुमारास कोष्ठी कारागीर झाशीहून चंदेरी गावात स्थलांतरित झाले. मूळची नऊवारी असलेल्या चंदेरी साडीच्या दोन्ही बाजूला पदर असतात. चंदेरी साडी तीन प्रकारच्या कापडात विणली जाते. सिल्क, चंदेरी कॉटन, कॉटन-सिल्क आदी चंदेरी विणण्याची ही कला फार पूर्वीपासून पिढ्यान पिढ्या चालत आलेली आहे. काही वेळेला रेशमासोबत जरीदेखील विणकामात वापरली जाते. त्यामुळे साडीला चमक येते...**

- नक्षीकाम : नाजूक नक्षीकाम, कमी प्रमाणातले जरी काम आणि पातळ विणकाम ही चंदेरी साडीची खासियत आहे. काठा-पदरावर सोन्याच्या व चांदीच्या धाग्यांनी जरीकाम आणि भरतकाम केलेले असते. चंदेरी साडी ही तिच्या सुबक नक्षीकामासाठी प्रसिद्ध आहे. नाणी, फुले, मोर यांसारखे नक्षीकाम पदरावर केलेले असते. पदरावरचे काठ विरुद्ध दिशेला विणलेले असतात किंवा फक्त एक छोटी पट्टी विणलेली असते. काठाच्या नक्षीकामावर बनारसी साडीचा प्रभाव जाणवतो. त्यामध्ये झालर, मीनाकारी, फूल-बुट्टी, कैरी हे प्रकार असतात. भरतकाम आणि जरीकामात मुघल राजवटीचा प्रभाव जाणवतो. १९७० च्या सुमारास चंदेरीच्या नक्षीकामात बदल झाले. गंगा-जामनी, मेहंदी रंगे हाथ, सदा सौभाग्यवती भव यांसरखे काठ महिलांमध्ये खूप प्रसिद्ध झाले.
- रंग : नावाप्रमाणेच चंदेरी साडी चंदेरी रंगात मिळते. चंदेरी साडी ही पांढऱ्या व हलक्या रंगातही विणली जाते. बदलत्या काळानुसार ही साडी लाल, काळ्या, निळ्या अशा गडद रंगातही मिळते. लाल रंगात विणल्या जाणाऱ्या साडीला 'आसावली' म्हणतात. मूळ हातमागावर विणलेल्या चंदेरीची किंमत ५००० पासून सुरू होते. चंदेरी कापडाची ओढणी, कुर्ता देखील १५०० हजारापर्यंत मिळते. साडीची किंमत नक्षीकाम आणि जरीकामावर अवलंबून असते.

## खरी चंदेरी साडी कशी ओळखाल

- नक्षीकाम हे विशेषतः सोने, चांदी किंवा तांब्याच्या पावडरीचे आवरण वापरून हातमागावर विणलेले असते.
- हातमागावर विणलेल्या चंदेरी साडीचा पृष्ठभाग नेहमी खाली वर असतो.
- हातमागावर विणलेल्या साडीचे नक्षीकाम उठून दिसते, तर मशीनवर विणलेल्या साडीचे नक्षीकाम वापरानुसार निघून येते.



## काळजी कशी घ्यावी ?

थंड पाण्यात अगदी थोडी पावडर वापरून साडी धुवावी. साडी उलट्या बाजूने सावलीत वाळत घालावी. इस्त्री देखील उलट्या बाजूने करावी. साडीची व्यवस्थित घडी करून ठेवावी. दोन्ही बाजूंना पदर असलेल्या या साडीची ओढणी बनवून पंजाबी ड्रेस वर घालता येते. साडीवरच्या नक्षीकाम आणि जरीकामामुळे अनारकली देखील उत्तम दिसेल. साडीवर भरजरी दागिने खुलून दिसतात.

## शॉर्ट न्यूज

### महिलेच्या अंगावरील दागिने पळवले

**टाकळीभान :** येथे तीन चोरट्यांनी ४३ हजार रूपये किंमतीचे दागिने व मोबाईलची चोरी करून पोबारा केला. याबाबत संगीता रवींद्र तगरे (वय ५३, रा. खळवाडी, टाकळीभान) यांनी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यात नमुद केले आहे की, ३० जून रोजी वडाळा महादेव येथे गेलो होतो. लग्नानंतर परत घरी आल्यानंतर रात्री घराबाहेर झोपलो होतो.पहाटे ३ वाजेच्या सुमारास अंधारात दोघांना पळताना पाहिले. मुलांना आवाज दिल्यानंतर दोन्ही मुलांनी चोरांचा पाठलाग केला. मात्र, अंधाराचा फायदा घेवून जवळ असलेल्या ऊसात ते पळून गेले.

### दत्तनगर-वाकडी रस्त्याची दुरुस्ती सुरु

**श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर ते वाकडी या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आमदार लहु कानडे यांच्या सूचनेवरून रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. दत्तनगर वाकडी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. अनेक वर्षापासून या रस्त्याचे काम न झाल्याने रस्त्यावर खड्डे पडून नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या रस्त्याचे डांबरीकरण करावे, अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### गुंडेगावच्या जि. प. शाळेस मोठी मदत

**नगर :** सहज फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील पाऊतका वस्ती जिल्हा परिषदेच्या शाळेस विविध वस्तूंची व शैक्षणिक साहित्यांची मोठी मदत करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वॉटर फिल्टर, विद्यार्थ्यांना उजळीसाठी शैक्षणिक तक्ते, वाचनालयासाठी गोष्टींची पुस्तके तसेच सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्टस ड्रेस, जेवण डबे, वॉटर बॅग, बूट व खाऊ देण्यात आला, अशी माहिती सहज फौंडेशनचे अध्यक्ष अशोक अकोलकर यांनी दिली.

### पालखी मार्गास मंजुरी मिळवून द्या

**संगमनेर :** तालुक्यातील काकडवाडी मार्गे असलेल्या खंबाळे ते तळेगाव दिघे दरम्यानच्या ३५ किलोमीटर अंतराच्या दुर्दशाग्रस्त संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गास मंजुरी मिळवून द्यावी, असे साकडे आज काकडवाडी येथील पदाधिकारी व ग्रामस्थांनी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना घातले. याप्रश्नी खासदार वाकचौरे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. काकडवाडी ग्रामपंचायत उपसरपंच जनार्दन कासार, रयत शेतकरी संघटनेचे संगमनेर तालुका अध्यक्ष दत्तात्रय घोलप, शिवशाहीर शरद महाराज ढवळे, सदस्य अशोक मुळे उपस्थित होते.

### विविध मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा

**शेवगाव :** शहरासह तालुक्यातील विविध मागण्यांसाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा भिमशक्ती इशारा संघटनेचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कर्डक व लाल निशाण पक्षाचे दत्ता घोरपडे यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. या मागण्याबाबत तात्काळ लक्ष घालून ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करावी अन्यथा भिमशक्ती संघटना व लाल निशाण पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असेही निवेदनामध्ये म्हटले आहे. निवेदनावर चंद्रकांत कर्डक व लाल निशाण पक्षाचे दत्ता घोरपडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिरुर विद्याधाम चे ५० विद्यार्थी शहरी विभागाच्या शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत

## चार विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकले



**शिरुर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इ.५वी) व पूर्व माध्यमिक (इ.८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच परीषदेमार्फत जाहीर करण्यात आला. या परीक्षेत येथील विद्याधाम प्रशालेने आपली यशाची परंपरा कायम राखत इ. ५ वी च्या २४ व इ. ८ वी च्या २६ अशा एकूण ५० विद्यार्थ्यांनी शहरी विभागाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर प्रशालेतील इ.५ वी च्या श्रीराज कुरंदळे आणि वेदांत जोरी तर इ.८ वी च्या परिजा मगर व तनिष्का पवार या चार विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याची माहिती प्रशालेचे प्राचार्य एस. टी. शेळके यांनी दिली.**

प्राचार्य एस. टी. शेळके यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत सर्व गुणवंत विद्यार्थी तसेच मार्गदर्शक अध्यापक यांचा प्रशालेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यासप्रसंगी प्रशालेचे उपप्राचार्य गुरुदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देवीकर, दिगंबर नाईक शिष्यवृत्ती विभाग प्रमुख दीपक गुजर, जयश्री गवंड व पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरी विभागातून सर्वाधिक संख्येने विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा मान याही वर्षी अबाधित राखत प्रशालेने यशाची परंपरा कायम राखली आहे.

इ.५ वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे : अस्मित गावडे, विराज शेळके, ज्ञानदीप मस्के, अर्णव भुसारे, शिव पाचर्णे,ओवी वाळुंज,शर्वरी औदुतवार, रुद्रांश गायकवाड, उत्कर्षा पाटील,तनुश्री रासकर, कृष्णा चौधरी, श्रेया गाडेकर, स्वरा भोसले, स्वरा भांड, साहील देवीकर, वेदांत भोईटे, आरव मदगे, वैभवी घावटे, मोहनीश पंदरकर, अमृता सरोदे, सिध्दी माने, पार्थ वाकडे.


इ.८वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे : श्रेयश चव्हाण, नील सोनवणे, प्राची शेळके, सिध्दी गुंड, श्लोक साबळे,भक्ती कोहकडे, तेजल जगदाळे, शंभूराजे पाचर्णे,अथर्व पठारे, शुभम खोडदे,हर्षल यादव,स्नेहा आटोळे, तृप्ती जाधव, सत्यम रसाळ, विराज बोरकर, आर्यन कोकाटे, मानसी दिवेकर, यशश्री मुळे, सुयश कर्डीले, सिध्दी मोहिते, सर्वज्ञ कडेकर, गायत्री लगड, स्नेहा झरेकर, सुमित भळगट.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील अध्यापक यमुना रायकर, गोपाल कुल, सोनाली सोनवणे, दीपाली पडवळ, ललिता भुजबळ, हर्षदा कौठकर,रोहिनी सालके, सागर पारधे, संदीप बनकर, रेखा विधाटे, मंगल भालेकर, प्राची कुलकर्णी, निता वाघमारे, विवेकानंद क्षीरसागर, सविता दिवेकर, अश्विनी गायकवाड, पवार मॅडम, तांबे मॅडम, यादव मॅडम, ढोले मॅडम आदींनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव प्राचार्य नंदकुमार निकम, शालेय समिती अध्यक्ष धरमचंद फुलफगर आणि सर्व सदस्य यांनी अभिनंदन केले.

## वाचकांच्या लेखणीतून

### मरणानंतरही जिवंत रहायचे असेल तर...

माणसाचे आयुष्य किती? त्याच्या मरणानंतर तो जितकी वर्षे समाजाच्या स्मरणात राहील तेवढेच! असे मी वाचले होते. त्याचे प्रत्यंतर वेगळ्या त-हेने मला आढळले.



डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम भारताचे माजी राष्ट्रपती होते. ते जसे शास्त्रज्ञ होते तसेच एक उच्च कोटीचे साहित्यिकही होते. ते म्हणतात,

मरणानंतरही जिवंत रहायचे असेल तर
एक काम जरूर करा
वाचण्यासारखे काही तरी करून दाखवा
किंवा
लिहिण्यासारखे काही तरी करून दाखवा

तत्वज्ञानाचा मुलामा असलेले किती सुंदर विचार! आपण सर्वांनी चिंतन करावे असे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

## सरपंच सेवा संघाची ग्रामविकास मंत्र्यांशी चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

**सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष बाबासाहेब पावसे यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान येथे राज्यभरातून सरपंच आले होते. यानंतर शिष्टमंडळाने ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांची भेट घेवून चर्चा केली. सरपंचांच्या विविध मागण्या** - ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन साहेब यांनी सात ते आठ मागण्या मंजूर करण्याचे आश्वासन दिले. मंत्रालयामध्ये मंत्री महाजन यांच्यासोबत शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सर्व सरपंचाने मागण्यांच्या घोषणा देत



आझाद मैदान दुमदुमून टाकले होते. सरपंच सेवा संघाचे नगर जिल्हाध्यक्ष संजय काळे यावेळी उपस्थित होते.

# जिल्हादंडाधिकाऱ्यांचे १२ जुलैपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू



**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ३७ (१) व ३७ (३) नुसार १२ जुलैपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे.**

नगर जिल्ह्यात आंदोलन, जाहीरपणे घोषणा देणे, आवेशपूर्ण भाषण करणे, वाद्य वाजवणे आदी कारणामुळे शांतता धोक्यात येऊन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी १२ जुलैपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक आदेशानुसार शस्त्रे, भाले, दंडुके, बंदुका आदी वस्तू बाळगण्यास मनाई आहे. त्याचप्रमाणे कोणतेही स्फोटक पदार्थ जवळ बाळगण्यास बंदी आहे.

हा आदेश शासकीय सेवेतील व्यक्तींना ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे. त्यांना लागू होणार नाही. तसेच प्रेतयात्रा, धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका, लग्न समारंभासाठी ज्यांनी संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक तथा सहायक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतली आहे, अशा व्यक्तींना हा आदेश लागू राहणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्याच्या प्रकरणातुन आरोपीची निर्दोष मुक्तता

## जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**नगर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्याचा आरोप असलेल्या विकास जगदाळे याची जिल्हा न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. आरोपी ने पीडित अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला व फोटो व्हाट्सअप ग्रुप वर व्हायरल करून बदनामी केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता.**

जुन २०२२ मध्ये नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला व फोटो व्हाट्सअप ग्रुप वर व्हायरल करून बदनामी केली. कॉलेज ला जाताना चोरून पाटलाग करत असे. त्यानुसार पीडित महिलेने तथाकथित आरोप करून



विकास जगदाळे आरोपी विरुद्ध नगर तालुका पोलीस ठण्यात भारतीय दंड संहिता कलम ३५४ (ड), ५०० ऑफ आणि कलम ११( ४),(५), १२ ऑफ पोक्सो कायद्याअन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानुसार आरोपीला सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा संपूर्ण तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. या खटल्यामध्ये सरकारी पक्षाने आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी साक्षीदारांच्या साक्ष नोंदवल्या. त्यानुसार आरोपीतर्फे ॲड. विकास ढोकळे यांनी साक्षीदारांची उलट तपास घेतले. त्यामध्ये पीडीतेचा घेतलेला उलट तपास महत्वाचा ठरला. त्या अनुषंगाने साक्षीदारांचे घेतलेले उलटतपास व न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद व तपासातल्या त्रुटी विशेष सत्र न्यायाधीश श्रीमती एम. एच. मोरे यांनी ग्राह्य धरून आरोपीची दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात ॲड. विकास ढोकळे, ॲड. प्रवीण तांबे, ॲड. तुषार कोतकर यांनी काम पाहिले.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
• प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
• गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
• Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
• स्तनांचे आजार आणि उपचार
• PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
• सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# नगर-पुणे रेल्वेमार्गासाठी पाठपुरावा करा

## मा. खा. प्रसाद तनपुरे यांचा खा. नीलेश लंके यांना सल्ला



राहुरी : प्रतिनिधी

**बलाढय शक्तींविरोधात लढून लोकसभा निवडणूकीत तुम्ही यश मिळविले असून आता नगर-पुणे रेल्वेमार्गासह नगर-मनमाड रस्त्याच्या कामासाठीही पुढाकार घ्या असा सल्ला मा. खा. प्रसाद तथा बापूसाहेब तनपुरे यांनी खा. नीलेश लंके यांना दिला.**

लोकसभा निवडणूकीत विजय संपादन केल्यानंतर खा. लंके यांनी राहुरी येथील तनपुरे यांच्या फार्म हाऊसवर जात मा. खा. प्रसाद तनपुरे यांची भेट घेत आशिर्वाद घेतले. यावेळी तनपुरे कुटूंबियांच्या वतीने खा. लंके यांचा सत्कार करण्यात आला. राहुरी नगरपरिषदेच्या मा.नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे, सोनाली तनपुरे, सोहम तनपुरे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. खा. तनपुरे म्हणाले, संसदेमध्ये विविध आयुधांचा वापर करून आपल्या मतदारसंघासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी तनपुरे यांनी त्यांच्या राजकीय वाटचालीतील अनुभव खा. लंके यांच्याशी शेअर करीत पूर्वीच्या व सध्याच्या राजकारणामध्ये झालेल्या बदलाचीही त्यांनी तुलना केली.विखे कुटूंबासारख्या बलाढया शक्तीविरोधात तुम्ही लढत देऊन निवडणूक जिंकलात. यशाची ही घोडदौड अशीच सुरू ठेवा, तनपुरे परीवार आपल्या पाठीशी सदैव असेल अशी ग्वाही तनपुरे यांनी दिली.

नगर-मनमाड रस्त्याच्या दुरूस्तीसंदर्भात आपण अलिकडेच मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन चर्चा केल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले. पुढील आठवडयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मंत्री गडकरी यांनी बैठकीचे आयोजन केले असून या बैठकीत या रस्त्याच्या कामासंदर्भात सकारात्मक निर्णय होईल असा विश्वास खा. लंके यांनी यावेळी व्यक्त केला. खा. लंके यांचे सहकारी तथा नांदूरपठारचे मा. उपसरपंच रविंद्र राजदेव यावेळी उपस्थित होते.

# संदीप पाटील जयंतीनिमित्त रक्तदान शिबीरास मोठा प्रतिसाद

## रक्तदान हे श्रेष्ठदान : सचिन पाटील वराळ

निघोज : प्रतिनिधी

**बाजार समितीचे माजी उपसभापती व निघोजचे माजी सरपंच संदीप पाटील वराळ यांच्या जयंतीनिमित्त निघोज येथील जैन स्थानक येथे संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन, निघोज ग्रुप ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

राळेगण थेरपाळ येथील ज्येष्ठ कारभारी भरत नाना शितोळे व अल्पसंख्याक समाजाचे नेते व पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संदीप पाटील वराळ यांच्या प्रतिमेचे पूजन राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखीले, पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर, वडनेरचे सरपंच राहुल सुकाळे, निघोजचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, वडनेर सोसायटीचे माजी चेअरमन भागाजी बाबर, पठारवाडी सोसायटीचे चेअरमन अनिल सुपेकर, माजी सरपंच शिवा पवार, गाडीलगावचे माजी सरपंच सुभाष गाडीलकर, राज्य मराठी पत्रकार संघाचे निघोज शहराध्यक्ष आनंद भुकन, पत्रकार संघटनेचे प्रवक्ते जयसिंग हरेल, मुस्लिम समाज संघटनेचे तालुका पदाधिकारी बशीरभाई मोमीण , तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, ग्रामपंचायत माजी सदस्य भिमराव लामखडे, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, जैन समाज संघटनेचे तालुका प्रवक्ते यश लोढा, आपले गाव गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग आदींच्या हस्ते संदीप पाटील वराळ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील डी फार्मसी व बी फार्मसीचे कॉलेजचे सचिव विराज वराळ पाटील, पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष संतोष ईधाटे, पारनेर तालुका पैलवान प्रतिष्ठानचे पदाधिकारी पैलवान सुभाष वराळ, आकाश वराळ पाटील, निलेश घोडे, निलेश खोबरे, राहुल लाळगे, हॉटेल नक्षत्र उद्योग समूहाचे संचालक शरद उर्फ गौरव पवार, मनोज ईधाटे, अक्षय ईचके, अक्षय वरखडे, राहुल दुणगुले, राहुल वराळ, गंगा वरखडे, कृष्णा निघोजकर, मनसेचे युवा नेते स्वप्नील आतकर, पत्रकार संदीप ईधाटे, सचिन जाधव, तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे, दर्शन घोगरे, संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, दर्शन घोगरे आदी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ व संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील म्हणाले गेली आठ वर्षांपासून संदीप पाटील वराळ यांच्या जयंतीनिमित्त निघोज व परिसरातील जिल्हा परिषद मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करूण आम्ही सामाजिक उपक्रम राबवीत आहोत तसेच रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे याचा फायदा सातत्याने रुग्णांना होत असतो यासाठी विखे पाटील फौंडेशन संचलित विळद घाट येथील विखे पाटील हॉस्पिटल संचलित रक्तपेढी माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते या शिबीरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून विखे पाटील रक्तपेढीचे डॉक्टर व आरोग्यसेविका यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळाले असल्याची माहिती वराळ पाटील यांनी दिली.

# उच्च शिक्षणामुळे मानवी जीवन समृद्ध

## अळकुटी महाविद्यालयात प्रथम वर्ष वर्गाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत



अळकुटी : प्रतिनिधी

**केवळ दहावी, बारावी नव्हे तर त्यानंतर उच्च शिक्षण घेणे क्रमप्राप्त असून उच्च शिक्षणामुळे मानवी जीवन समृध्द होते असे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी केले.**

अळकुटी येथील लोकनेते पद्भुषण बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. पारखे हे बोलत होते.

डॉ. पारखे म्हणाले, पदवीचे शिक्षण हे उच्च शिक्षणाचा पाया मानले गेले आहे. बारावी झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी पदवीचे उच्च शिक्षण घेणे क्रमप्राप्त आहे. शिक्षणाने मानवी जीवन समृध्द होते. आपल्या आयुष्याची पुढील दिशा ठरत असते. पदवीच्या शिक्षणाने विद्यार्थ्यांना नोकरी वा व्यवसायात अनेक संधी प्राप्त होतात, ज्यामुळे भविष्य उज्वल होत असते असे डॉ. पारखे यांनी सांगितले.

पद्मश्री व पद्मभुषण विखे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून तसेच विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देउन कार्यक्रमास प्रारंभ झाला. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात तर राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला. उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संजय जाधव यांचीही यावेळी भाषणे झाली.

यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतीक विभागप्रमुख प्रा. स्वाती फापाळे यांनी केले तर प्रा. विशाल रोकडे यांनी आभार मानले.

### विखे परिवाराने शिक्षणाची गंगोत्री पोहचविली

**पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभुषण बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाची गंगोत्री पोहचविली आहे. त्यामुळे गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला पाहिजे.**

**डॉ. शरद पारखे**
प्राचार्य, अळकुटी महाविद्यालय

# डॉ. श्रीकांत पठारेंची आरोग्य सेवा तालुक्यासाठी वरदान

## डॉ. नितीन रांधवन यांचे प्रतिपादन




वनकुटा : प्रतिनिधी

**डॉ. श्रीकांत पठारे यांच्यासारखे आरोग्यदूत गोरगरीब वंचित दुर्गम भागातील समाजासाठी काम करत असल्याने त्यांची आरोग्य सेवा ही पारनेर तालुक्यासाठी वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन डॉ. नितीन रांधवन यांनी व्यक्त केले.**

वनकुटे येथे डॉ. श्रीकांत पठारे यांच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.रांधवन बोलत होते पुढे बोलताना डॉ. रांधवन म्हणाले की डॉ. पठारे हे गेली तीस वर्ष त्यांच्या परिवाराच्या मदतीने तालुक्यात आरोग्य सेवेचे उत्तम काम करत आहेत तसेच विविध क्षेत्रांमध्ये त्यांचं काम वाखाणण्याजोगे असून या आरोग्य सेवेच्या माध्यमातून तालुक्यातील विविध भागांमध्ये त्यांनी या शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब वंचित दुर्बल व गरजू रुग्णांच्या सेवेचा एक नवा पायंडा पाडल्याचे मत डॉ. रांधवन यांनी व्यक्त केले.

वनकुटे येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन शिवसेना तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे व डॉ. नितीन रांधवन यांच्या उपस्थितीत करण्यात आले.यावेळी वनकुटे गावचे माजी उपसरपंच भास्करराव शिंदे, ज्येष्ठ नेते भानुदास गागरे, रामदास मुसुळे, कारभारी मुसुळे, दीपक खामकर, संतोष केदारी, यादव गागरे, माधव गागरे, डॉ. कैलास औटी, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, बुधा घुले, सुरेश बर्डे, छबू साळवे, भाऊसाहेब गागरे, श्रीरंग औटी, पारुनाथ वाबळे, गंगाधर शिंदे, लक्ष्मण खामकर, बाबासाहेब पठारे, देविदास शिंदे, आदी वनकुटे येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# धर्म संस्कृती आणि सामाजिक कामांना प्राधान्य देण्याची गरज

## समाधान महाराज शर्मा यांचे प्रतिपादन




निघोज : प्रतिनिधी

**धर्म संस्कृती आणि सामाजिक कामांना प्राधान्य देण्याची गरज निर्माण झाली असून युवकांनी देशसेवा करताना धर्म संस्कृती आणि सामाजिक कामांना प्राधान्य देण्याची गरज असून आयुष्य जगताना ते आनंदी कसे करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन युवा किर्तनकार समाधान महाराज शर्मा यांनी केले.**

दौलतराव भाऊराव वरखडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त किर्तन सेवेत शर्मा महाराज बोलत होते. कै.वरखडे यांनी रामनामाचा जप करीत अखंड आयुष्यभर देवाची सेवा करताना आपला संसार निटनेटका कसा होईल व यातून आपल्या मुलांचा, मुलींचा, नातेवाईक व मित्र परिवार यांचा सर्वांचा विचार करूण आनंदी संसार केला म्हणून आज त्यांचे सुपुत्र सोमनाथ महाराज वरखडे, सून आशाताई वरखडे व सर्व परिवार समाजाभिमुख कामे करीत मळगंगा देवीच्या आशीर्वादाने समाजात नावलौकिक मिळवीत असल्याचे समाधान महाराज शर्मा म्हणाले.

यावेळी निघोज, शिरूर तालुका, पारनेर तालुका व परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच सोमनाथ महाराज वरखडे मित्र मंडळ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कपिलेश्वर दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ महाराज वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्त आशाताई वरखडे, सोसायटीचे माजी चेअरमन अनंतराव वरखडे कन्हैया ज्वेलर्सचे संचालक ॲड.कृष्णा वरखडे यांनी आलेले ग्रामस्थ व उपस्थितांचे आभार मानले.उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी परिसरातील भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुदेव प्रशालेच्या १६ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

## यशराज जवक राज्यात झळकला




सुपा : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी २०२३-२४ मध्ये आयोजित केलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत सुपा एमआयडीसी नजीकच्या गुरुदेव सेमी इंग्लिश स्कूल या शाळेचे तब्बल १६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकल्याचे गुरुदेव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर यांनी सांगितले.**

या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पात्रसाठी पाच हजार रुपये व इयत्ता आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सात हजार रुपये प्रतिवर्षी मिळणार आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेचे पूर्वनियोजन, अनुभवी अध्यापक वर्ग, अभ्यासात सराव व सातत्य या गोष्टीमुळे यश मिळाले असल्याचे असल्याने गेल्या पाच वर्षात या शाळेतील ४१ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाल्याचे संस्थेची संस्थापक सुभाष मगर यांनी सांगितले.

यशस्वी विद्यार्थी व गुण पुढील प्रमाणे इयत्ता पाचवी : यशराज प्रशांत जवक- २७० गुण राष्ट्रीय ग्रामीण शिष्यवृत्तीधारक, वैष्णवी भरत मगर -२५० गुण.सई श्रीकांत थोरात -२४४ गुण चैतन्य अमोल जाधव -२४२ गुण, प्राजक्ता मंगेश गवळी -२३६ गुण, आरोही सुनील रणसिंग- २३० गुण, स्वराज पांडुरंग मगर -२२८ गुण, तन्मय दिलीप भांगरे- २२४ गुण, अनुष्का रमेश दळवी- २२२ गुण.

इयत्ता - आठवी :चैतन्य प्रवीण मापारी- २३८ गुण, साईराज सतीश बोर्डे -२३८ गुण, ज्ञानेश्वरी प्रशांत जवक- २१६ गुण, प्रथमेश तात्या थोरात- २०० गुण, प्राची विनायक मुळतकर -१९६ गुण, हुजेफ जावेद शेख- १८८ गुण, वरील विद्यार्थ्यांना प्रशालेचे प्राचार्य अविनाश भिंगारदिवे, अश्विनी भोसले, संभाजी मते, वर्षा फलके, आदर्श शिक्षिका मंगल दोरगे, विस्तारअधिकारी शोभा शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी सीमा राणे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी अभिनंदन केले आहे.

# हुलकावणी देणाऱ्या यशाचा जिद्दीने पाठलाग !

## ■ निमोणेच्या हर्षद हिंगेंची यूपीएससी परिक्षेत बाजी ■ भारतीय वन सेवेत ९३ व्या क्रमांकाने निवड

शिरुर : प्रतिनिधी

**यूपीएससी हेच ध्येय होते परंतु यशाचा पाठलाग करतांना हुलकावणी मिळत होती. पहिल्या प्रयत्नात प्रारंभिक परीक्षा पास झाली परंतू मुख्य परीक्षेत अपयश आले. दुसऱ्या प्रयत्नामध्ये प्रारंभिक परीक्षेत देखील अपयश आले. तिसऱ्या प्रयत्नामध्ये प्रारंभिक परीक्षा पास झाली तसेच मुख्य परीक्षेत ही यश आले परंतु मुलाखतीमध्ये कमी पडलो. असे अनेक वेळा घडले. ४ वेळा यूपीएससीची मुलाखत दिली, राज्यसेवेची पण २ वेळा मुलाखत दिली परंतु यश हुलकावणीच देत होते. पण नाउमेद झालो नाही की खचून गेलो नाही. अखेर या वर्षी जिद्दीने अभ्यास करुन यशाचा पाठलाग केला आणि त्यावर स्वार झालो...**

यूपीएससी परीक्षेतून भारतीय वन सेवेत ९३ व्या क्रमांकाने निवड झालेल्या निमोणेच्या हर्षद हिंगेची ही यशोगाथा एमपीयूसी आणि युपीएससी परीक्षेत सातत्याने अपयशी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना आदर्श ठरावी अशीच आहे.

हर्षद यांचे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण निमोणे जवळच्या भोसवाडी नावाच्या छोट्याशा वाडीमध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झाले. तर पाचवी ते आठवीपर्यंतचे शिक्षण निमोणे गावातील श्री नागेश्वर विद्यालयात झाले. आठवी नंतर ते मामाकडे श्रीगोंदा येथे शिक्षणासाठी गेले. आठवी ते दहावीचे शिक्षण श्रीगोंदा येथील महादजी विद्यालयामध्ये झाले. २००८ साली इयत्ता दहावीला त्यांना ९१.३८% मार्क्स मिळाले ते दहावी मध्ये श्रीगोंदा तालुक्यात पहिले आले व अहमदनगर जिल्ह्यात तिसरे आले. पुढे त्यांनी गव्हर्नमेंट पॉलिटिकल कॉलेज पुणे येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये डिप्लोमा केला. मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधील डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर पुढे सिंहगड अकॅडमी ऑफ इंजिनियरिंग पुणे येथे बीईला ॲडमिशन घेतले व मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये बीई पूर्ण केले. पुढे त्यांनी हिस्टरी हा विषय घेऊन यूजीसी नेट परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांनंतर २०१५ पासून यूपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. युपीएससीचा अभ्यास करता करताच त्यांनी एन्व्हायरमेंटल सायन्स अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयांमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केले.

प्रत्येक मुलाखतीच्या खूप सकारात्मकता आणि आत्मविश्वास होता शेवटी त्याचे रुपांतर यशामध्ये झाले. २०२३ मध्ये यूपीएससीची प्रारंभिक परीक्षा पास झाली त्यानंतर मुख्य परीक्षेत यश मिळाले. मुलाखती मध्ये ही यश मिळाले आणि यूपीएससी कडून त्यांची ९३ व्या क्रमांकाने निवड झाली. हर्षदच्या यशानंतर त्यांच्या कुटुंबीयांसह संपूर्ण निमोने गावाने जल्लोष केला. हर्षला त्याच्या कष्टाचे फळ मिळाले. त्याग केल्याशिवाय आपण मोठ्या गोष्टींचे ध्येय गाठू शकत नाही त्यामुळे यशाचा पाठलाग करताना सणवार, उत्सव, नातेवाईकांचे सुखदु:ख कशातच त्याला सहभागी होता आले नाही.

हर्षदच्या यशामध्ये त्याच्या आई-वडिलांचा, चुलते किंचक हिंगे, चुलती रंजनाताई व चुलत बंधू रविंद्र ह्यांचा खूप मोठा वाटा आहे. आपला हर्षद नक्कीच यूपीएससी पास होणार हा आत्मविश्वास त्यांना होता. ज्या ज्या वेळी हर्षद यांना अपयश आले त्या त्या वेळी हर्षद यांचे आई-वडील व सर्व कुटुंबीय हर्षद यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी हर्षद यांना नैतिक पाठींबा दिला आधार दिला. आर्थिक पाठबळ दिले. हर्षद ह्यांना ज्या ज्यावेळी पैशाची अडचण भासली त्यावेळी त्यांचे चुलत बंधू रवींद्र यांनी वेळोवेळी त्यांना मदत केली. हर्षद यांना कुठलीही अडचण भासू दिली नाही. ज्यावेळी विद्यार्थी यूपीएससी सारख्या परीक्षेची तयारी करत असतात त्यावेळी जरी थोडे अपयश आले तरी अशा अशावेळी विद्यार्थ्यांना कुटुंबियांनी आधार देणे खूप आवश्यक असते आणि हाच आधार हर्षद यांना वेळोवेळी त्यांच्या घरच्यांकडून मिळाला. माझ्या यशामध्ये निमोणे गावातील ग्रामस्थ तसेच मित्रांचाही मोठा सहभाग आहे , असेही हर्षद यांनी आवर्जून नमूद केले.



### प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर यश !

**यूपीएससीची परीक्षा पास होणारच ही माझी प्रबळ इच्छा होती. या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मी अभ्यासामध्ये सातत्य ठेवले. प्रचंड मेहनत घेतली. अपयश आले तरी संयम ठेवला. आज देखील मी पहाटे चार साडेचारला उठून दररोज कमीत कमी तीन तास अभ्यास करतो. अभ्यासासाठी पहाटेची वेळी अत्यंत उत्तम वेळ असते. संयम आणि चिकाटी बरोबरच आत्मविश्वास खूप महत्वाचा आत्मविश्वास असेल तर आपण काहीही करू शकतो. आयुष्यात शॉर्टकट नसतो. जर तुम्हाला खरोखरच काही करावयाचे असेल तर मेहनती शिवाय पर्याय नाही.**

**हर्षद हिंगे** निमोणे, ता. शिरूर

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com